क्रमांक :४५२६/वि.प.वि.अ.स. /ड-१५
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक [10 MAR 2021 ~

:ज्ञापन :

**विषय** : विधानपरिषद विनंती अर्ज समिती अंतर्गत उप समितीची नियुक्ती करणेबाबत...

**"अकोला महानगरपालिकेच्या अनागोंदी कारभाराविषयी कार्यवाही होण्याकरीता"** या विषयावरील श्री.गोपीकिसन बाजोरिया वि.प.स. यांच्या विनंती अर्जासंदर्भात विधानपरिषद विनंती अर्ज समितीच्या गुरुवार, दिनांक ०४ मार्च, २०२१ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख, विधानपरिषद विनंती अर्ज समिती यांनी सदर प्रकरणी पुर्नतपासणी करण्यासाठी उप समिती नेमण्याच्या दिलेल्या निदेशानुसार महाराष्ट्र विधानपरिषद नियम १६७ मधील तरतुदींच्या अनुषंगाने खालील मा. विधानपरिषद सदस्यांचा समावेश असलेली उप समिती नियुक्त करण्यात येत आहे.

१) श्री. निलय नाईक, वि.प.स.

२) श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स.

(उप समितीच्या आयोजित करण्यात येणाऱ्या प्रत्येक बैठकीचे वेळी तसेच अभ्यासदौऱ्याचे वेळी/ठिकाणी विनंती अर्जदार श्री.गोपिकिसन बाजोरिया, वि.प.स. हे अपरिहार्यपणे साक्षीसाठी उपस्थित राहतील व त्यांना प्राप्त झालेली संपूर्ण माहिती/पुरावे इ. समितीस तातडीने उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करतील.)

**<u>उप समितीची कार्यकक्षा पुढील प्रमाणे असेल :-</u>**

अकोला महानगरपालिकेमध्ये मोठया प्रमाणात योजनेमध्ये अनियमित खर्च, कामकाजातील त्रुटी गैरकारभार, अनुदानाचा गैरवापर, अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात समन्वय नसणे, पंतप्रधान आवास योजनेमध्ये मंदगतीने कामे सुरू असणे,शौचालयाच्या कामात अनियमितता तसेच १२ व १३ व्या वित्त आयोगाच्या निधीमध्ये अनियमितता इत्यादी संदर्भात चौकशी करण्यासाठी प्रत्यक्ष अकोला महानगरपालिकेस भेट देऊन प्रकल्पांची पहाणी करणे सर्व संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेणे व मा.उप सभापती,महाराष्ट्र विधानपरिषद तथा विधान परिषद विनंती अर्ज समितीचे समिती प्रमुख यांनी वेळोवेळी दिलेल्या निदेशानुसार समितीच्या बैठका आयोजित करुन तत्संदर्भातील अहवाल समितीस दोन महिन्याच्या आत सादर करणे.

**(विलास आठवले)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

...२/-

**याची प्रत :**

१. विधानपरिषद विनंती अर्ज समितीचे सर्व सदस्य
२. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३. सर्व अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४. प्रधान महालेखापाल (१), महाराष्ट्र, मुंबई.
५. प्रधान महालेखापाल (२), महाराष्ट्र, नागपूर.
६. संचालक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
७. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
८. मा.उप सभापती, तथा समिती प्रमुख विधानपरिषद विनंती अर्ज समिती यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
९. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
१०. मा. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहाय्यक
११. प्रतिवेदक (निवडश्रेणी) /कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
१२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष
१३. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१४. व्यवस्थापक, आकाशवाणी आमदार निवास/विस्तारित जूने विधान भवन, मुंबई
१५. व्यवस्थापक, आमदार निवास, नागपूर.
१६. व्यवस्थापक, शासकीय विश्राम धाम, (जूने व शासकिय विश्राम भवन) (नवीन) क्वीन्स गार्डन, पुणे
१७. व्यवस्थापक, शासकीय विश्रामगृह, अमरावती
१८. व्यवस्थापक, सुभेदारी गेस्ट हाऊस, औरंगाबाद.
१९. संगणक कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
२०. विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.